# प्रकरण पहिले
# 'मराठी कादंबरी'

# प्रकरण पहिले
# मराठी कादंबरी

**प्रास्ताविक :-**

इतर प्राण्यापेक्षा वेगळे अस्तित्व सिध्द करणारा माणूस प्राणी. गतिमान जीवनाचा तो प्रणेता. जीवनाच्या विकासातील टप्प्यात त्याने भाषेचा शोध लावला. गाणी गुणगुणता गुणगुणता, कथा सांगतासांगता त्याने साहित्याच्या प्रांगणात गरुडझेप घेतलेली दिसते. आपल्या मनातील सुप्त विचार दुसऱ्याला सांगणे हा त्याचा स्थायी भाव असतो. यातूनच त्याचे जीवन प्रवाही रहात असत. त्यामुळे त्याच्या जीवनाची प्रगती सतत सुरु असते. विचारांची देवाणघेवाण सुरु ठेवण्याच्या त्याच्या अमोल अशा गुणामुळेच आजचा मानव निसर्ग निर्मितीच्या घटकांपैकी सर्वात श्रेष्ठ कलाकृतीत गणला जातो.

लोकसाहित्य मौखिक वाङ्मय हे मानवातील कलात्मक वृत्तीची ओळख पटवून देते. मानवाने भाषा लिपीच्या कोंदणात बसवून साहित्याचा प्रवाह नित् वाहता ठेवण्याचे मोलाचे कार्य केले. तिथून मानवाच्या विकासाला प्रचंड गती मिळाली. वेगवेगळ्या कारणांनी साहित्य निर्मिती होऊ लागली. आपल्या जीवनातील संघर्ष, अनेक प्रसंग तो शब्दबध्द करु लागला. मनात चाललले विचारांचे वावटळ तो लिलया इतरांपर्यंत पोहचवू लागला. त्याच्या साहित्य निर्मीती मागील प्रयोजने, प्रेरणा व्यक्तिपरत्वे भिन्न असतील, आस्वाद घेणारांमध्ये मत भिन्नता असू शकेल, पण माणूस साहित्य निर्मिती करणे अगर त्याचा आस्वाद घेणे हा जीवनातील अपरिहार्य भाग मानू लागला.

परमेश्वराने दिलेल्या अनेक वरदाना पैकी मानवी मन हे एक वरदानच मानावे लागेल. बहिणाबाईच्या शब्दात ते एक विधात्याला जागेपणी पडलेले स्वप्नच आहे. त्याचा थांग लागत नाही. मन,बुध्दी, चित्त, अहं यांच्या एकतत्वातून तर कधी त्यांच्या तटस्थतेतून मानवाला त्याच्या जागृत अवस्थेत पडलेले स्वप्न असे साहित्यालाही म्हणता येईल. माणूस कथेच्या प्रांगणात खेळता खेळता विकासाच्या अभिजात प्रवृत्तीप्रमाणे त्याने कादंबरीत प्रवेश केला. कोणत्याही गोष्टींचा शोध विकास नियमाप्रमाणे गरजेतूनच होतो.

**कादंबरीचे पदार्पण :-**

भारतीय कथात्म साहित्यात कादंबरीचा उद्‌भव पाश्चात्य साहित्याच्या आगमनाने झाला. इंग्रजी साहित्यातून आलेले 'नॉवेल' भारतीय साहित्यावर प्रभाव पाडू लागले आणि एत्तद्देशीय भाषेतून 'नॉवेल' साकार होऊ लागली. बाणभट्टाच्या साहित्यकृतीतील 'कादंबरी' या नायिकेवरुन नॉवेलला 'कादंबरी' हे मराठी नाव रूढ झाले.

अंत:करणात उमटणाऱ्या भावनांच्या लहरी दुसऱ्यापर्यंत पोहचवण्याच्या धडपडीत माणसाला कथेचे विश्व अपुरे वाटू लागले. त्याने मर्यादेच्या चौकटी सोडून एक विस्तृत पटावर प्रवेश केला. त्याला कादंबरी नाव रुढ झाले. पाश्चात्य साहित्यातील नव्या विचारप्रवाहाचा ओघ मराठी साहित्यात उतरु लागला. सुरुवातीला भाषांतरीत,रुपांतरीत असे साहित्य निर्माण होत गेले. मानवाच्या मेंदूतील सुप्त शक्ती जागृत झाली व त्याने रुपांतरे, भाषांतरे ऐकता, वाचता, लिहिता स्वतंत्र प्रज्ञेचा अर्क प्रदर्शित केला.

''तसे पाहिले तर कादंबरी हा वाङ्मयप्रकारच इतका सर्वसमावेशक आहे की, त्याला व्याख्येच्या चौकटीत बसवणे किंवा कादंबरी या नामाभिधानाने अंगुलीनिर्देश करणे यात आलेल्या सर्व कादंबऱ्याचे व्यवच्छेदन लक्षण स्पष्ट करणे आजही कठीण आहे.''[१]

चंद्रकांत बांदिवडेकरांचे वरील मत लक्षात घेता असे म्हणता येईल की, कादंबरी हा विषय इतका विस्तृत आहे, की त्याला ठराविक व्याख्या देऊन मर्यादित करता येणार नाही. सुरवातीला या वाङ्मय प्रकाराकडे दुर्लक्ष झाले असले तरी आज सर्व प्रकारांत कादंबरीने एक श्रेष्ठ दर्जा प्राप्त केला आहे.

**कादंबरीची व्याख्या :-**

१) कादंबरीसारख्या विस्तृत पट असणाऱ्या वाङ्मय प्रकाराला व्याख्येच्या चौकटीत बसविणे तितकेसे योग्य ठरणार नाही. तरीही काही लेखकांनी आपल्या कल्पकतेने तिची व्याख्या केली आहे. कादंबरीची व्याख्या करताना इ. एम. फॉस्टर म्हणतो, ''पन्नास हजार शब्दांच्यावर लिहिलेली कोणतीही काल्पनिक गद्य कथा म्हणजे कादंबरी होय.''

२) वाईल्ड – ''मानवी जीवनाशी संलग्न अशा मानवाचे त्याच्या कृती, साहस आणि भावभावना व्यक्त करणारी आणि विविध व्यक्तिसमुहांचे दर्शन घडवणारी व तिच्या शेवटच्या रुपात जुन्या रोमान्सपेक्षा वेगळी ठरणारी अशी कल्पित गद्य कथा'' म्हणजे कादंबरी.

३) प्रथमत: ''मानवी जीवनाची गद्य कथा'' म्हणून रॉल्फ फॉक्सने कादंबरीला संबोधले. त्याच्या मते येथेच फक्त मानवी जीवनाचे सम्यक दर्शन घडविता येते.

४) जे. बी. प्रिस्टले म्हणतात कादंबरी म्हणजे ''मानवी जीवनाचा आरसा''.

५) डेविड सिसील म्हणतो, ''जीवित जगताचा परिचय करुन देणारी एक कला.''

६) हेनरी जेम्सच्या मते, कादंबरी म्हणजे ''वैयक्तिक जीवनानुभूती होय.''

७) मा. का. देशपांडे म्हणतात, ''कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्य चित्र होय.''

८) बापट–गोडबोले यांच्या मते, ''कादंबरी म्हणजे काल्पनिक प्रतिसृष्टी.''

९) ''कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडवणारी सविस्तर ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी'' असे श्री. मा. कुलकर्णी म्हणतात.

''लोकप्रियता व लोकजीवनाभिमुखता या बाबतीतच नव्हे, साहित्याचे विविध प्रश्न अटीतटीने लढवणे कादंबरी प्रकाराच्या प्रांगणातच अधिक शक्य होते.''[२] असे बांदिवडेकरांचे मत आहे.

कथेतील मर्यादेचे पालन करण्यापेक्षा, काव्याला अलंकारांनी सजवण्यापेक्षा, नाटकाचे बंधनियम पाळण्यापेक्षा, आपल्या मनातील प्रसंगाचे, खटकणाऱ्या काही घटकांचे किंवा व्यथेचे व्यवस्थित संकलन करणे कादंबरीकारास शक्य झाले. बहुधा साहित्य निर्मितीही संघर्षातून होते, दु:खातून तिचे कढ उतरत असतात. संकटातून, दु:खातून अनेक बरे–वाईट अनुभव त्याच्या चित्तात कल्लोळ करीत असतात. शिवाय जीवनात काही घेतलेले असते, पटलेले असते, ते इतरांना सांगणे गरजेचे वाटते. जे जे माहित आहे ते इतरांना सांगण्याचा मानवी स्वभाव आहे. ते सांगण्यासाठी अनेकांना कादंबरीचा पट पटला.

सुरुवातीच्या काळात तर बोधपरच जास्त लिहिले गेले. माहिती नाही ते जाणून घेणे व समजलेले इतरांना सांगणे हा मानवी स्वभाव आहे. निसर्ग हा इतका गूढ आहे, की अनादी काळापासून माणूस निसर्गातील अनेक घटकांविषयी जाणून घेण्याचा सतत प्रयत्न करीत आहे. निसर्गातील गूढता, त्यातील घडणाऱ्या अनेक घडामोडी हे जाणून घेताना त्याला सतत 'का?' हा प्रश्न पडतो व हा 'का' च त्याच्या विकासातील प्रमुख केंद्रबिंदू वाटावा इतका जवळचा आहे. या का ?, कशासाठी याच्या भोवती फिरता फिरता त्याला करावा लागणारा विचार, आलेले अनुभव तो शब्दबध्द करतो. त्याला आपण साहित्य म्हणतो.

जीवनपटावर मनुष्यास अनेकवेळा अनेक गोष्टी, प्रसंग खटकतात. त्यामुळे त्याचे संवेदनशीलमन हेलावते. तेव्हा त्याच्या विचारमंथनाचा परिपाक म्हणजे साहित्य. उदा. वि. स. खांडेकरांना दुसऱ्या महायुध्दातील विध्वंस अस्वस्थ करुन गेला. हिटलरची हुकूमशाही व त्यातून होणारा मानवी संहार यांनी त्यांचे मन अस्वस्थ झाले. 'बॉम्ब' चा वापर त्यावेळी सर्वप्रथम करण्यात आला. अनेक निष्पाप जीव बळी गेले. एका व्यक्तीच्या अहंकारासाठी कोट्यावधी निरपराध जीव गेले. कोणी काही करु शकले नाही. असे का ? या का भोवती त्यांचे मन फिरत राहिले. त्यातून निष्पाप पक्षावर हल्ला करणारा पारधी, ही मध्यवर्ती कल्पना घेऊन साकारली 'क्रौंचवध'.

**मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी :-**

अशा प्रकारे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय सर्व पातळीवर उमटणाऱ्या लाटांतून साहित्य निर्माण होते. त्याचप्रमाणे मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरीचा मान असणारी 'यमुना पर्यटन' ही कादंबरी आहे .हिंदू स्त्रीचे होणारे विदारक दर्शन यातून घडवण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. अनिष्ट रुढी-परंपरा विरोधी फुंकलेली ती तुतारी आहे.व्यक्तीच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या जीवनात जेव्हा तीव्र स्वरूपाचे संघर्ष निर्माण होतात तेव्हा संघर्षाच्या मुळाशी जाऊन विचार करणाऱ्या, सृजनशील मनाच्या चिंतनाचा आविष्कार म्हणजे साहित्य होय.

''कादंबरी वाङ्मय प्रकारात लेखकाची जीवनदृष्टी महत्वाची असते. ही जीवनदृष्टी संपन्न बनवण्यात लेखकाचे सूक्ष्म जीवन निरीक्षण, माणसाच्या मनोव्यापारापेक्षा गुंतागुंतीचे त्याचे ज्ञान या गोष्टी सक्रिय असतात. कादंबरीत काही व्यक्तींच्या द्वारा लेखक जीवनाचे आपले निरीक्षण वा

आकलन प्रकट करत असतो."[३] असे बांदिवडेकर यांनी म्हटले आहे. त्यावरुन कादंबरी लेखनात कादंबरीकाराचे एक प्रकारे जीवनविषयक भाष्यच व्यक्त होत असते.

यमुना पर्यटन मध्ये अनेक हिंदू स्त्रियांच्या सुट्या-सुट्या कथा येतात. 'कादंबरी'चे स्वरुप नाही. कालानुक्रमे 'यमुना पर्यटन' ही पहिली कादंबरी आहे. परंतु तिचा निर्मितीहेतू ख्रिश्चन धर्मप्रसार व हिंदुधर्मदोष दाखविण्याचा आहे. निखळ कलात्म हेतू नाही. 'मुक्तामाला' लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी निखळ कलात्महेतुने लिहिली म्हणून तीच पहिली मराठी कादंबरी मानली गेली.

**स्त्रियांचे कादंबरी लेखन :-**

आपल्याकडे स्त्री संत साहित्यापासून लिहित आहे. तरीही तिच्या आजच्या लेखनामागची प्रेरणास्थळे कोणती ? याचा विचार केला असता जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, वि. रा. शिंदे, महर्षि कर्वे, डॉ.आंबेडकर इ. महात्म्यांच्या कार्यापुढे आपले मस्तक नत होते.

आजची स्त्री शिक्षण घेऊन अंतरमनातील भावविश्व साहित्यात साकारु लागली त्यामागे वरील व्यक्तींचे कार्य मोलाचे आहे. या लोकांच्या योगदानामुळे, अविरत प्रयत्नामुळे तिच्या लेखणीला व्यापक दृष्टी लाभली. तिला अस्मितेचे तेज आले. शिवाय ती अधिक धीट बनली.

महात्मा फुल्यांनी स्त्रीमधील दडपलेली शक्ती ओळखली. तिला शिक्षणाची गरज आहे हे ओळखले. अनेक वर्षांची परंपरा खंडीत करणे सोपे नव्हते उलट खूप अवघड असून ही त्यांनी ते करुन दाखवले. १८४८ साली स्त्रियांसाठी पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरु केली. आपल्या पत्नीस शिकवून तिच्याकडून इतर स्त्रियांना विद्यादानाच्या कार्यास वाहून घेण्याची प्रेरणा दिली.

समाजासाठी, स्त्रीसाठी सक्रिय कार्य करणाऱ्या या उभयतांना त्याच समाजाकडून किती त्रास सोसावा लागला ते आपण जाणतोच. पण स्वत:चे पूर्ण जीवनच ते समाजासाठी स्वाहः करतात म्हणूनच ते महात्मे होतात. त्यांच्या कार्याने स्त्री शिकू लागली. तिथूनच ती आपल्या स्वत्वाचा शोध घेऊ लागली.

त्यानंतर ताराबाई शिंदे या स्त्रीने 'स्त्री-पुरुष-तुलना' हे पुस्तक लिहून आपल्या भावनेच्या अंतरात कोंडलेल्या हुंकाराचा स्फोट केला. अतिशय धीटाईने त्यांनी लेखन केलेले दिसते. स्त्रीचे समाजातील, कुटुंबातील स्थान, तिला अगदी जन्मापासून मिळणारी वागणूक, विवाहाच्या पध्दती, तिची अवहेलना, पुरुषांकडून होणारी तिची हेटाळणी हे सारे त्यांनी अगदी स्पष्टपणे लिहीले आहे. आजच्या स्त्रीवादाची बीजे आपल्याला तिथेच रुजली गेलेली दिसतात. यांचा काळही १८२३ ते १८९२ हा आहे. म्हणजे आजच्या या स्त्रीवादी चळवळीची सुरवात स्त्रीमनात तेव्हाच कुठेतरी झालेली होती .

नंतर पंडिता रमाबाई यांनीही या कार्याची धूरा सांभाळलेली आहे. इंडियन नॅशनल काँग्रेसमध्ये स्त्रियांचा सहभाग असावा असे त्यांचे ठाम मत होते. या विचाराने, त्या तन-मनाने स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झालेल्या होत्या. त्यांचा वारसा, मळलेली वाट नव्याने तुडवणाऱ्यांपैकी वि. रा. शिंदे यांनीही स्त्रियांच्या हक्कासाठी, तिच्या घसरलेल्या स्थानाला पुन्हा बळकटी देण्यासाठी मोलाचे कार्य केले आहे.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनीही आपल्या जीवितकार्यात स्त्री शिक्षणाला अत्यंत महत्व दिले होते. स्त्रीची उपेक्षा, वेदना त्यांनी जवळून पाहिली होती. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबाला सोसाव्या लागणाऱ्या भयानक परिणामाची तमा न बाळगता आपले कार्य 'आधी केले मग सांगितले ' अशा पध्दतीने सुरु केले. स्वातंत्र्योत्तर काळात महर्षी कर्वे यांनी स्त्री-शिक्षणाची चळवळ सुरु केली व १९७५ पर्यंत स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फुटली.

तद्नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या दलित बांधवांसाठी कार्य करताना स्त्रियांच्या प्रश्नाकडेही लक्ष दिलेले दिसते. शिक्षण घेणे हा स्त्रीचा हक्कच आहे. पण याच्याही पुढे जाऊन समाजातील सर्व क्षेत्रात तिचे स्थान, तिचे अस्तित्व आदरणीय आहे. याची नव्याने ओळख त्यांनी समाजाला करुन दिली. हाती घेतलेले कार्य स्त्री प्रामाणिकपणे व व्यावहारिकपणे पार पाडू शकते. तिच्याजवळ तेवढी क्षमता आहे या विश्वासाने त्यांनी स्त्रीला कुटुंबात, समाजात स्थान हवे असे मानले.

त्यांनी हिंदू कोड बिलाच्या प्रस्तावातून सामाजिक न्यायाचे तत्व प्रधान मानून घटनेमध्ये स्त्रियांना पुरुषांशी समान हक्क दिले. ज्या मतदानाच्या अधिकारासाठी युरोपमधील स्त्रियांना लढा द्यावा लागला, तो अधिकार भारतीय स्त्रियांना स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच मिळाला.

स्त्रियांनी शिक्षण घेतल्यानंतर तिची प्रतिमा उंचावेल या उदात्त हेतूने त्यांनी प्रयत्न केले. 'स्त्री शिक्षणाच्या प्रगतीवरुन मी त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करतो' असे आंबेडकर म्हणत. स्त्री ही एक व्यक्ती आहे व तिलाही व्यक्तिस्वातंत्र्य हवे असे डॉ.आंबेडकर यांचे मत होते. त्यादृष्टीने त्यांनी कायद्यानेही तिला स्थिरता देण्याचा प्रयत्न केला.

'स्त्री' हा समाजाचा अति महत्वाचा घटक. रुढीने, निसर्गाने तिचेवर चूल–मूल हीच परंपरा लादली किंवा तिने स्वीकारली असली तरी तिने साहित्याची धुराही काही अंशी सांभाळल्याचे दिसते. अगदी महानुभव परंपरेतील महदाइसा, नागाइसा पासून मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई आदी स्त्रियांनी त्या त्या काळात साहित्य निर्मितीचा प्रयत्न केलेला आहे.

पुढच्या काळात स्त्री शिकू लागली, आपले विचार शब्दबध्द करु लागली. जोतीरावांपासून साहित्य वारसा घेतलेल्या सावित्रीबाईंनी स्वतंत्र वाङ्मय निर्मिती केली. आपणही आपले अनुभव, तळमळ, मनातील भावनांचा आविष्कार शब्दातून व्यक्त करु शकतो असा आत्मविश्वास स्त्रीमध्ये रुजू लागला. मी ही समाजाचा तितकाच महत्वाचा घटक आहे. मला स्वतंत्र अस्तित्व आहे. असा आत्मगौरव तिला प्राप्त झाला. ती स्वत:चे आत्मपरीक्षण करु लागली. मी लाचार नाही, हीन नाही, अबला नाही. समाज माझ्या शिवाय अपूर्ण आहे याची तिला नव्याने समज आली. तिची अस्मिता जागी झाली.

म्हणजे अस्मिता, आत्मविश्वास, आत्मगौरव, आत्मपरीक्षण हे 'अ' कार तिच्या साहित्यातून साकारु लागले. स्वातंत्र्यपूर्व काळात विभावरी शिरुरकर यांनी 'कळ्यांचे निश्वास', 'हिंदोळ्यावर', नंतर शांताबाई नाशिककर यांनी 'लग्नाचा बाजार', 'हा का धर्म', गीता साने यांनी 'निखळलेली हरिणी', 'हिरवळीखाली', 'माळरानांत धुके' ह्या कादंबऱ्या लिहून कादंबरी लेखनात आम्ही स्त्रिया ही कमी नाही हे दाखवून दिले. याचा अर्थ स्त्रीचे हळवे, संवेदनशील मन कथा, काव्य, भक्ती यांचा प्रवास करत करत कादंबरी लेखनापर्यंत येऊन पोहचले.

स्वातंत्र्योत्तर काळातही अनेक स्त्रियांनी कादंबरी लेखन केले. कुटूंब, घर, संसार एवढेच तिचे सुरुवातीचे विश्व होते. त्यातही प्रधान हेतू मनोरंजन असला तरी नंतर तिने

चौकटीबाहेर डोकावून समग्रतेचे दर्शन घडवले. याचे उदाहरण म्हणजे विभावरीं शिरूरकरांच्या 'बळी', ने अनेकांचे लक्ष नरकयातना भोगणाऱ्या तळागाळातील समाजाकडे वेधले. तिथून मात्र काही लेखिकांनी वैयक्तिक, कौटुंबिक पातळी ओलांडून उंबरठ्याबाहेर नजर टाकली. स्त्रियांनी रंजनवादी लेखनातून बाहेर पडून थोडी वेगळी वाट स्विकारुन मराठी कादंबरीत मोलाची भर टाकली. या संदर्भात कमल देसाई व गौरी देशपांडे यांचा उल्लेख आदराने करायला हवा. त्यांच्या प्रत्येक कादंबरीतून स्त्री मनाच्या वेदना शब्दबद्ध होत गेल्या. त्यांच्या जीवनविषयक आकलनाचा आणि शोधाचा केंद्रबिंदू स्त्री हाच आहे. त्यांनी चितारलेली स्त्री ही आधुनिक आहे. स्वतंत्र व मुक्त आहे. स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्याची दृष्टी त्यांच्या या कादंबऱ्यातून व्यक्त होते.

**कादंबरीचे बदलते स्वरुप :-**

कादंबरीच्या बदलत्या स्वरुपाचा विचार करताना आपल्या लक्षात येते की, कालपरत्वे इतर क्षेत्राप्रमाणे कादंबरीचा विकास किंवा वाटचालही टप्या-टप्यांनी होत गेली. कादंबरीत समग्रपणे जीवनदर्शन घडविले गेले. शब्दात गुंफून साकारलेले जीवनदर्शन म्हणजे साहित्य असेच कादंबरीचेही वर्णन होऊ लागले. स्थल काल परत्वे कादंबरीनेही समाजातील अनेक घटकांत प्रवेश केला. शिक्षण प्रसार, प्रसारमाध्यमे यांनी समाजमन प्रवर्तित झाले व त्याचे पडसाद जीवनावर होऊ लागले. त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटू लागले. अनेकांना लिहिण्याची प्रेरणा मिळाली. मध्यमवर्गीयांची सेवा करता करता कादंबरी ग्रामीण-दलित अशा आशयाच्या अंगानेही लिहिली जाऊ लागली. तिचे हुंकार समाजमनावर स्पष्ट परिणाम करु लागले.

मराठी साहित्यातील एक समृद्ध दालन म्हणजे कादंबरी विश्व होय. या नात्याने मानवी जीवनातील सुखदु:ख टिपण्यासाठी कादंबरीचा विस्तृत पट योग्य ठरतो या जाणिवेने अनेकांनी हा वाङ्मयप्रकार हाताळला. १९२० पूर्वीच्या कादंबरीकारांनी या प्रकारचा पाया घातलाच होता. हरिभाऊ आपटे, नाथ माधव, वि. सि. गुर्जर, वा. गो. आपटे, ना. ह. आपटे, वि. वा. हडप अशा अनेक मान्यवरांनी दर्जेदार कादंबऱ्या लिहून हा वाङ्मय प्रकार लोकप्रिय केला होता. रसिकांनी तिला मनात आश्रय दिला. साहजिकच अनेकांनी मुक्त हस्ते हा प्रकार स्वीकारला. तत्कालीन समाज जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला.

१९२० नंतरच्या कालखंडातील वाङ्मयीन निरीक्षण केले तर अनेक गोष्टी निदर्शनास येतात. कथा, कादंबरी, काव्य, नाटक इ. ललित वाङ्मयप्रकार आधीच्या कालखंडातही होतेच. परंतु १९२० नंतर मात्र

साहित्यिकांनी त्याला निराळे रूप दिल्याचे जाणवते. १९२० ते १९९० या कालखंडात मराठी कादंबरीला वेगळे वळण मिळाले. तिचे क्षेत्र व्यापक व विशाल बनले. या कालखंडातील कादंबरी अधिक सूक्ष्म व सखोल बनली. याला कारणही तसेच होते. त्या काळात समाजात प्रचंड उलथापालथी झाल्याने त्याचे पडसाद कादंबरीत उमटले गेले. पहिले महायुध्द संपले. टिळक युगाचा अस्त होऊन गांधी युगाचा उदय झाला. तेव्हा गांधी विचाराचे वारे वाहू लागले. समाजाच्या व राष्ट्राच्या विकासासाठी माणसातील माणुसकी जागवण्याचे कार्य चालू होते. याच काळात रशियातील मार्क्सवाद्यांचे लोकांना आकर्षण वाटू लागले होते. या सर्वांचा प्रभाव पडून साहित्य निर्मिती होऊ लागली.

मराठी कादंबरीला अद्‌भूत वातावरणातून बाहेर काढून तिला वास्तवाचे परिमाण देणा-यांत १९२० पूर्वी हरि नारायण आपटे यांचे एकच नाव नजरेसमोर येते. पण तद्‌नंतर मात्र तिच्यात होणारा बदल नजरेत भरतो. कादंबरीचे सर्व बाबतीत म्हणजे वैचारिक, कलात्मक, प्रचारात्मक वैभव अनेकांनी वृद्धिंगत केले. डॉ. श्री.व्यं.केतकर, वा. म. जोशी, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, मा. वि. वरेरकर, विभावरी शिरूरकर, श्री. ना. पेंडसे, गो. नि. दांडेकर, रणजित देसाई, सुमती क्षेत्रमाडे, द. र. कवठेकर, जयवंत दळवी, ह. मो. मराठे असे कितीतरी नामवंत कादंबरीकार दृष्टीसमोर येतात. या साऱ्यांनी आपल्या प्रतिभेला जाणीवपूर्व लेखनाची जोड देऊन कादंबरीला विशालता व सखोलता प्राप्त करुन दिली. त्या कालखंडात काल्पनिक कथाविलासापेक्षा व्यक्तिदर्शन व समाजदर्शन अधिक घडू लागले. विषयाच्या दृष्टीनेही कादंबरीने कथा विस्तारली. स्त्री पुरुष प्रेमातून तिने डोके बाहेर काढून सामाजिक प्रश्नांशी हातमिळवणी केली. जीवनात प्रेम हा एकच विषय नसतो, तर समस्याही असतात, त्यांचे चित्रण करणे अपरिहार्य आहे, याची कादंबरीतून जाणीव होऊ लागली. राजकीय, सामाजिक, आर्थिक, जातीय अशा विविध विषयांत कादंबरी लिहिली जाऊ लागली. सुशिक्षित मध्यमवर्गीय तरुण तरुणींच्या स्वप्नरंजनात्मक प्रेमभावनेचे मोहक चित्रण करुन फडक्यांनी कादंबरीला ललित सुंदर बनवले. प्रेमभावनेला ध्येयवादाची जोड देऊन रंजकतेबरोबर आपली कादंबरी खांडेकरांनी समाजाभिमुख बनवली. माडखोलकरांनी धिटाई व शृंगार यांचा सुरेख संगम करुन तिला राजकीय जीवनाची चौकट प्राप्त करुन दिली. जीवनात प्रेमाला ध्येयवादाची जोड हवी. तसेच एवढ्यावर जीवन मर्यादित रहात नाही हे ओळखून अनेकांनी समाजातील समस्या अचूक हेरुन त्यावर प्रकाश टाकला. 'धावता धोटा' ही गिरणी कामगारांचे जीवन रंगवणारी मामा वरेरकरांची कादंबरी नवीन क्षेत्रात प्रवेशली.

कादंबरीत लालित्य हवे पण त्यापेक्षा समस्यांची दाट छाया जीवनावर असते. ती अधिक प्रखर असते हे केतकरांनी दाखविले. त्यांनी लालित्याची पर्वा न करता 'ब्राह्मण कन्या', 'परागंदा', सारख्या

अनेक कादंबऱ्यातून समाजातील समस्यांकडे वाचकांचे लक्ष वेधले. वामन मल्हार जोशी यांनी आधीच्या कालखंडात 'रागिणी' व 'आश्रमहरिणी', यासारख्या कादंबऱ्यातून तत्वचर्चात्मक पध्दतीने नव्या स्त्रीचे दर्शन घडवले होतेच. पण १९२० नंतर 'इंदू काळे सरला भोळे', 'सुशीलेचा देव' यासारख्या कादंबऱ्यातून लालित्यही दर्शवले. याच काळात ह. ना. आपट्यांनी बोधवादाबरोबर मध्यमवर्गीय पण बंडखोर अशा स्त्रीची प्रतिमा निर्मिली. मात्र या काळात बंडखोर स्त्री चित्रणात वास्तवातील भेदकता आणली ती विभावरी शिरुरकरांनी. 'हिंदोळ्यावर' सारखी कादंबरी लिहिल्यानंतर 'बळी' या कादंबरीने समाजातील अगदी उपेक्षित घटकांकडे वाचकांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर मानवी मनाचा तळ गाठला विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण' ने. बऱ्याच अंशी वेगळी वाट चोखाळणाऱ्या मर्ढेकरांनी 'रात्रीचा दिवस' व 'पाणी' मधून अपरिचित अशा संज्ञाप्रवाही कादंबऱ्या लिहिल्या.

कादंबरीचा प्रवास आता सदाशिव पेठेतून बाहेर पडून ग्रामीण दलित वर्गापर्यंत पोहचला होता. र. वा. दिघे यांनी पाणकळा, सराई अशा ग्रामीण व आदिवासीचे दर्शन घडवणाऱ्या लोकप्रिय कादंबऱ्या लिहिल्या. १९४५ ते ६० या कालखंडात मराठी कादंबरीने प्रादेशिकता आत्मसात केली. मराठी कादंबरी रंजक व आकर्षक तर झालीच पण तिच्या जाणीवेचे क्षेत्रही विस्तारले. वास्तवातील समस्या चित्रित करण्याचे सामर्थ्य तिच्या अंगी आले. कादंबरीकारांची वाढ झाली. राजकीय, तत्वचर्चात्मक, ग्रामीण, दलित, प्रादेशिक ऐतिहासिक, सामाजिक अशी विविध रुपेही तिला प्राप्त झाली. साहजिकच गद्याच्या पंक्तीत कादंबरीला मोलाचे स्थान लाभले. तंत्रविषयक जाणीव व प्रयोगशीलता या गुणाने ती नटली. लेखकमुखी, पात्रमुखी, पत्रात्मक अशी रचनादृष्ट्या तिला भिन्न रुपे मिळाली. वाचकांना उघड उपदेश करण्यापेक्षा सूचकतेने जीवनमापन करावे, ही जाणीव त्या वेळच्या कादंबरीने निर्माण केली.

कादंबरीच्या वाटचालीचा विचार करता आपण कालखंडाप्रमाणे तीन टप्प्यात तिचे वर्गीकरण करु शकतो –

१) स्वातंत्र्यपूर्व कादंबरी.

२) स्वातंत्र्योत्तर कादंबरी

३) नव कादंबरी.

## स्वातंत्र्यपूर्व कादंबरी :–

स्वातंत्र्यपूर्व काळातील कादंबरी विश्वात अनेकांनी योगदान दिले. अद्भुतरम्यतेच्या भोवऱ्यातून बाहेर काढून कादंबरीला मनोरंजन व उद्बोधन ही नवी उद्दिष्ट्ये हरिभाऊंनी स्वीकारली व कादंबरीची नवी

वाट निर्माण केली. त्यांनी कादंबरीला विविध क्षेत्राची कथा प्राप्त करुन दिली. त्यातून समाजदर्शन, स्त्री चित्रण होऊ लागले.

१९२० नंतर स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत विचार करता त्यावेळी पाश्चात्य संस्कृतीने प्रवेश केला होता. नियतकालिकांबरोबर इतर वाङ्मय ही लोकांच्या वाचण्यात येऊ लागले. त्यातून अनुकरण, रुपांतर, भाषांतर ह्यात साहित्यनिर्मिती होऊ लागली. लोकांच्या मनावरील समाजातील उलथापालथीचा अनेक संवेदनशील मनांनी ठाव घेतला. त्या मनावर होणारे घाव शब्दरुपाने वाहू लागले. सर्वसामान्य माणूस व त्यांची दु:खे, समस्या केंद्रस्थानी राहिल्या. अनेकांनी आपली प्रतिभा, ज्ञान, कल्पकता, विचार बैठक आदी वैशिष्ट्यपूर्ण अंगांनी कादंबरीलेखन केले. कोणी रंजकता, सौंदर्य, लालित्य जपले. कोणी तात्विक दृष्टीने लेखणी वळवली, कोणी लालित्याला ध्येयवादाची जोड दिली. जीवन फक्त सौंदर्यावर किंवा मनोरंजनावर अवलंबलेले नसते. जीवनात समस्या, संकटे, संघर्ष असतात. त्याचेही दर्शन साहित्यातून होणे गरजेचे असते. या न्यायाने लेखन केले. समस्या असणारच पण त्यावर हळुवार फुंकर घालण्यासाठी विनोदाची जोड हवी. अन्यथा जीवन नीरस होईल. या विश्वासाने विनोदी लेखकांनी आपली ताकद वाढवली.

पु. ल. देशपांडेनी जीवनात रखरखीत उन्हाबरोबर श्रावणसरींची आवश्यकता वर्तवली. अशा अनेक लेखकांबरोबर, डॉ. केतकर, माडखोलकर, मामा वरेरकर, न. चिं. केळकर आदींनी कादंबरी क्षेत्रात मोलाची भर घातली.

नंतर १९३१ ते ४७ पर्यंत अनेकांनी क्षेत्र विस्ताराची कामगिरी जोमाने बजावली. याच कालखंडात कादंबरी क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग झाले. १९४२ मध्ये कथात्मक प्रयोग म्हणून मर्ढेकरांनी 'रात्रीचा दिवस' कादंबरी लिहिली. १९३६ साली विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण' ने स्वत:चा वेगळा ठसा उमटवला. अनुभव व रूप यांच्या अभिन्नत्वाचा प्रत्यय आणून देणारी कादंबरी म्हणून तिचे कौतुक झाले. मध्यमवर्गीयाभोवती फिरत राहणाऱ्या कादंबरीचा मोहरा ग्रामीण भागातील सुखदु:खाकडे वळवण्याचा प्रयत्न र. वा. दिघेंनी 'पाणकळा' द्वारे केला.

याच कालखंडात ना. सी. फडके यांनी उन्माद (१९९९), शाकुंतल (१९४३), अखेरचे बंड (१९४४), माझा धर्म (१९४०) इ. कादंब-या लिहिल्या. एकूण कालखंडावर फडके- खांडेकरांचे वर्चस्व होते. त्याचबरोबर ग. ल. ठोकळांची 'गावगुंड' गाजली. नागरी वातावरणातून वाचकाला यशस्वीपणे ग्रामीण वातावरणात नेण्याचा प्रयत्न दिघे, कवठेकर, ठोकळ यांनी केला.

या कालखंडात सारांश रुपाने आपल्याला असे सांगता येईल की स्वातंत्र्यपूर्ण कालखंडात कादंबरीची 'यमुना पर्यटन' द्वारे बाबा पद्मनजी यांनी रोवलेली मुहूर्तमेढ पुढे ह. ना. आपट्यांपासून सर्वांनी सचेतन केली. सामाजिक समस्यांना वाचा फोडली गेली. मध्यमवर्गीय जीवना बरोबर कादंबरीने ग्रामीण-दलित वर्गात प्रवेश केला. स्त्रिया लेखन करु लागल्या. शिक्षण घेऊन वाचता वाचता इतरांची दुःखे अचूक वेचून लेखनात प्रगटू लागल्या.

अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व कालखंडातच कादंबरीचा वृक्ष चांगला फोफावला होता. सर्वसामान्यांपर्यंत साहित्याने आपली कक्षा रुंदावली होती. त्यामध्ये स्त्रियांनी आपल्या वेदना, समस्या हुंकारायला सुरवात केली होती. गांधी, मार्क्स, फ्रॉईड यांचा प्रभाव लेखकांच्या मनावर होताच शिवाय खांडेकर, फडके यांचाही प्रभाव टिकून होता. विविध क्षेत्रात सहज प्रवेश करुन कादंबरीची गंगा तळागाळापर्यंत पोहचून सर्वत्र आपल्या कक्षा रुंदावत, नवनवीन प्रवाह सामावून घेत अखंड वहात होती. अनेक प्रतिभावंत तीत मनसोक्त डुंबत होते.

**स्वातंत्र्योत्तर कादंबरी :-**

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. ग्रामीण भागातील तरुण लेखक लिहिते झाले. ग्रामीण कादंबरी मराठीत उदयास आली. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. अनेक बदल घडून आले. सामाजिक, राजकीय, स्थित्यंतरे घडून आली. काही वर्षे कादंबरी आहे तशीच राहिली. १९७५ नंतर मात्र तळागाळातील मंडळीच पुढे सरसावली. ग्रामीण व दलित साहित्याचे नवे दालन उघडले गेले.

फडके, खांडेकरांच्या धाटणी भोवती फिरत राहणारी मध्यमवर्गीयांची मक्तेदारी दर्शवणारी कादंबरी चौफेर डोकावू लागली. नव्या प्रेरणा, नवा समाज, नवी दिशा घेऊन कादंबरी जन्मली. तिचा आवाका विस्तारला स्त्री मनापासून ते सामान्य जनतेचे मन ती रेखाटू लागली. उदा. स्त्री मनाच्या व्यथा सांगता -सांगता विभावरी शिरुरकरांनी १९५३ मध्ये 'बळी' च्या रुपातून नवी वाट व नवे अनुभव विश्व चितारले. मांग-गारुडी, समाजाने सोसलेल्या दुःखाचे, त्यांच्यातील ओंगळपणाचे, त्यांच्या पशुवत जीवनाचे विदारक चित्रण चित्रित केले.

१९५० मध्ये बा. भ. बोरकरांनी 'भावीण' मधून स्त्रीची असहायता प्रगट केली. समाजातील स्त्री महत्तम घटक असूनही तिला समाजातील कितीतरी न पटणाऱ्या गोष्टी पटवून घेऊन हार पत्करावी लागते. अशा प्रसंगात तिची सात्विक वृत्ती, बुध्दी हे सर्व गुण फिके पडतात.

रणजित देसाई यांनी बेरड जमातीवर 'बारी' कादंबरी लिहिली. श्री. ना. पेंडशांनी 'रथचक्र' मधून सामान्य स्त्री ही संघर्षाने पेटून उठते हे दाखवले.

म्हणजेच पांढरपेशांच्या सुखदु:खाचे चित्रण करण्यात गुंतलेली कादंबरी समाजात इतरही घटक आहेत जे खरेच वास्तव जीवनाचे यथार्थ दर्शन घडवण्यापासून वंचित होते, तेथे पोहचली. त्यांच्या शोकांतिका शब्दरुपाने प्रगट करण्याचा प्रयत्न करु लागली. प्रेम, प्रणय हेच फक्त कादंबरीचे विषय नसून समस्यांना समर्थपणे साद घालणे हा कादंबरीचा विषय आहे हे अनेकांनी सिध्द केले.

परिस्थितीने फरारी झालेला फकीरा पोलीसांना हुलकावणी देत राहिला पण अण्णाभाऊंनी त्याला अचूकपणे शब्दात बंद केला. माणूस ज्या समाजात जन्मतो, वाढतो त्या मातीशी त्याचे अतूट नाते जोडलेले असते. त्या मातीने त्याच्या मनावर जे संस्कार केलेले असतात. तिच्याशी प्रामाणिक राहून त्या प्रदेशाचे चित्रण तो साहित्यात करतो. त्याला प्रादेशिक कादंबरी संबोधन मिळाले. ग. ल. ठोकळ, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव यांचा प्रामुख्याने ग्रामीण कादंबरीकार म्हणून उल्लेख होऊ लागला.

शिक्षणाचा सुगंध दलित वस्तीपर्यंत पोहचताना त्यांची लेखणी सचेतन झाली. आपल्या वेदना, असाहयता, यांचे जिवंत दर्शन ती रेखाटू लागली. नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडोळा' कादंबरी दलित कादंबरीचा मैलाचा दगड ठरली. जसे भावले तसे जे अनुभवले ते प्रामाणिकपणे उतरवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रंजनवाद, कल्पनाविलास व कृत्रिमता यापासून अलिप्त राहून त्यांनी लेखन केले.

स्वातंत्र्योत्तर काळात चरित्रात्मक कादंबऱ्यांचा आणखी एक प्रवाह मिळाला. थोरा मोठ्यांचे, इतिहासात नाव नोंदवणाऱ्या व्यक्तींचे चरित्र पुढील पिढीला स्मरावे, त्यांची आठवण रहावी, त्यांच्या कार्याचा, गुणांचा, कौशल्याचा इतरांना आदर्श मिळावा अशा आशावादातून लेखन झाले. उदा. 'आनंदी गोपाल', 'पुत्र मानवाचा', 'स्वामी', 'श्रीमान योगी', 'संप', इ.

सारांश, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कादंबरीने गरुडझेप घेतली. उपेक्षितांचे,समूहमनाचे दु:ख चित्रित करण्याचा प्रयत्न केला. पुराणकथेला वर्तमानाचा अर्थ देण्याचा प्रयत्न केला. उदा. 'ययाती', 'मृत्युंजय', 'राधेय' इ. कादंब-या पौराणिक विषयावर आधारित आहेत. 'स्वामी', 'झेप' या कादंबरी लेखनात इतिहासातून 'माणूस' शोधण्याचा प्रयत्न झाला.

'यमुना पर्यटन', 'मुक्तामाला' पासून सुरुवात झालेला कादंबरीचा प्रवाह अनेक प्रवाह सामावून घेत आपली कक्षा दशदिशांना विस्तारत अविरत वहात आहे. अनेकांनी कला रंजकता शृंगारली.

अनेकांनी ध्येये, समाज मन जपले. नंतर अनेकांनी वास्तव जीवन कादंबरीत आणले. सुखापेक्षा, कलेपेक्षा, दु:खे, वेदना यांनी अनेकांना डिवचले. त्यांच्या वेदनांचे कढ अनेकांनी निदर्शनास आणले. अलिकडे हा प्रवाह वास्तववादी अतिवास्तववादी, विस्तववादी होऊन मनोविश्लेषणाच्या अतिसंवेदनशील रेखाटनातून 'संज्ञा प्रवाही' स्वरूपात साकार होऊ लागला आहे.

**१) कादंबरी क्षेत्रातील तिसरा टप्पा प्रवाह म्हणजे नव कादंबरी :-**

एखाद्या गोष्टीचा मानव जीवनावर परिणाम होतो. पण जेव्हा त्याचा अतिरेक होतो तेव्हा त्याचे दुष्परिणाम दिसू लागतात. तसेच काहीसे इथे झाले आहे. पाश्चात्य शिक्षणाने भारतीयांची समाजमने संजीवन मिळाल्याप्रमाणे प्रस्फुरित झाली. अनेक प्रेरणा, अनुभव, जाणीवा, उणीवा यांचा समाज आला. पण आज भारतीय मन त्यात कुठेतरी हरवले आहे असे वाटू लागले आहे. पाश्चात्य हवेचा झोत आला, झंझावातात रुपांतरीत झाला व त्याने भारतीय मन प्रदूषित होऊन गुदमरु लागले.

वास्तववादाच्या नावाखाली व्यक्तिदर्शन घडवता घडवता 'व्यक्ती' व 'दर्शन' दोन्ही मूल्ये बाजूला राहून व्यक्तितील विकृतीचे, उघडे दर्शन होऊ लागले. साहित्य हे अनेक प्रयोजनातून साकारत असते. ज्ञानलालसा, अनुभव, बोध असे अनेक हेतू त्यामागे असू शकतात. निव्वळ स्वप्नरंजन किंवा दिवास्वप्नांची पूर्ती यातून निर्मिलेले साहित्य, समाज मनाला ज्ञान, बोध तर सोडाच पण निखळ आनंदही देऊ शकणार नाही. उलट समाज मनाला विकृतीच्या खाईत लोटेल. उदा. ' वासूनाका' या भाऊ पाध्ये लिखित कादंबरीने खळबळ माजवली. 'स्वगत' (जयवंत दळवी), 'रात्र काळी घागर काळी' (चिं.त्र्य.खानोलकर) अशा काही कादंबऱ्यांची निर्मिती झाली. नव्या कादंबरीत जीवनातील गुंतागुंतीची जाणीव अधिक तीव्र झाल्याचे दिसते. यापूर्वी कांदबरी खूप उथळ होती. पण नव्या कादंबरीने मात्र आणखी खोलवर जाऊन मानवी मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मानवी मनातील वासना विकास, विध्वंसक प्रवृत्ती, राग लोभ, देशप्रेम इ. गोष्टींचे लेखक अधिक धिटाईने चित्रण करताना दिसतात. चिं. त्र्य. खानेलकर, जयवंत दळवी यांनी विलक्षण कथा बीजांचा वापर करुन प्रत्यक्ष जीवनातील वास्तवता आविष्कृत केली. मार्क्सवादी विचार, कष्टकऱ्यांच्या व्यथा-कथा, जाणीवा-उणीवा, हक्क-अधिकार कादंबरीत व्यक्त होऊ लागला. मानवी मनातील सुप्त कामभावनांची गुंतागुंत फ्रॉईडवादी कादंबरीतून व्यक्त होऊ लागली.

नव्या कादंबरीत भाषा प्रवाह व्यक्तिरेखानुसारी असल्यामुळे त्या जीवंत वाटतात. नव्या कांदबरीला अनुभव व वास्तवता अधिक जवळची वाटली. त्यामुळे तिने लीलया सर्वत्र प्रवेश केला.

शेती, उद्योग, कामगार, बेकारी, राजकारण, विज्ञान, अंधश्रध्दा, स्त्री-समस्या, पुरुषी अहंकार, व्यभिचारी वृत्ती, कुमारिकांचा प्रश्न, विवाहबाह्य संबंध, विधवा, लैंगिक छळ अशा एक ना अनेक विषयांना कादंबरी मापू लागली. बंगल्यापासून झोपडीपर्यंत तिने प्रवेश केला.

मराठी कादंबरीतील नवे नवे प्रवाह व तिच्या प्रवृत्तीत झालेले बदल असे आहेत. काळाची नवनवी आव्हाने स्वीकारत तिचा प्रवास अविरत चालू आहे. काळाप्रमाणे साहित्यही बदलत राहणार तरीही आपले वेगळे अस्तित्व टिकवत कादंबरीचा प्रवास अखंड सुरु आहे.

**२) कादंबरीचे अंतरंग :-** घटक व स्वरूप —

चित्र, गीत, नृत्य इ. सारखीच ललित लेखन ही देखील एक कला आहे. नियतीने अगणित गोष्टी देऊन जन्मताच मानवाला अलंकृत करुन पाठवले आहे. तसेच प्रतिभेचे लेणेही काही जणांना उपजतच देऊन त्याचा माणूस होण्याचा गौरव वाढविला आहे. ही प्रतिभा तो आपल्या कल्पनाशक्तीने शब्द रुपात प्रगट करीत असतो.

कादंबरीचा विस्तृत पट रंगवण्यासाठी लेखकाला उपजत प्रतिभा किंवा कल्पनाशक्तीच्या नुसत्या भराऱ्या मारुन चालत नाही. आपली कादंबरी, वाचनीय, स्मरणीय व्हावी असे प्रत्येकाला वाटत असते. प्रत्येक कलाकृतीकार हा समाजातील, निसर्गातील अनेक घटक घेऊन अनुभवातून आपली कलाकृती निर्माण करीत असतो. ती प्रत्येक कलाकृती ही त्या लेखकाची नवनिर्मिती असते. अपत्यासारखे त्याचे तिचेवर प्रेम असते. म्हणून आपल्या अपत्याचे सर्वांकडून कौतुक व्हावे असे प्रत्येक माता-पित्यांना वाटणे स्वाभाविक आहे. पण हे अपत्य सुंदर दिसावे, गुणी असावे तरच ते इतरांना आवडेल हेही त्याला माहीत असतेच. त्यासाठी प्रत्येक ललितकृतीकार हा आपली कलाकृती निर्मितीबाबत अनेक घटकांचा विचार करतो. नव्हे त्याला अनेक घटकांच्याकडे लक्ष देऊनच लिहावे लागते.

कादंबरी लिहिताना लेखकाने अनुभवांचे दालन, कथानक, भाषाशैली, वातावरण निर्मिती, व्यक्तिदर्शन, संघर्ष इ. घटकांचा बारकाईने विचार करणे गरजेचे असते. निसर्गाकडून व समाजातील विविध स्थळातून लेखकाने अनुभव वेचले पाहिजेत. आपल्या प्रतिभेला गरुड झेपेची कक्षा रुंदवायची असेल तर त्याने अनुभव अक्षरशः अभ्यासले पाहिजेत. अंतकरणात त्यांची साठवण केली पाहिजे. बारीक-मोठ्या, चांगल्या-वाईट व्यक्तीचे, परिस्थितीचे त्याने अवलोकन करुन अनुभवात भर घातली पाहिजे. अनुभव सर्वांना येतात. पण ते अंतकरणात रुजवणे, त्यांचा प्रवाह आतपर्यंत जाऊ देणे हे संवेदनशील मनालाच जमते. अंतर्मनातील संवेदना सहानुभूती ही सदैव जागृत हवी. योग्य वेळी ती

साठवण आठवणीत आणून देते. फडक्यांनी आपल्या प्रतिभा-साधन या ग्रंथात अनुभवाचे अनन्यसाधारण महत्व विशद केले आहे. 'सत्य हेच सौंदर्य' या वाक्याचा त्यांनी उद्‌घोष केला आहे. ललितलेखकाने संकुचितपणा अवलंबला तर त्याची साहित्यकृती हिणकस होण्याची भीती असतेच, उलट त्याने डोळे उघडे ठेवून नव्हे तर डोळ्यात जीव एकवटून जगाकडे, बदलणाऱ्या समाजाकडे, निसर्गातील घडामोडीकडे पाहायला हवे. जळी, स्थळी, पाषाणी सर्वत्र निसंकोच त्याची दृष्टी फिरत राहिली पाहिजे व त्या दृष्टीतही वेधकता , वेचकता हवी. फडके तर स्पष्टच सांगतात की, ''ज्याला उत्तम लिहायचे असेल त्याने लिहावे कमी, पहावे अधिक. लेखकाने लेखणीपेक्षा अवलोकनच सतत चालू ठेवले पाहिजे.''[४]

वाचकाच्या अंत:करणापर्यंत पोहचायचे असेल तर लेखकाने आपला प्रत्येक हुंकार हा अंत:करणातून काढला पाहिजे. तेव्हाच लेखक व वाचक यांच्यात तन्मयता, तद्रूपता निर्माण होईल.

त्यानंतर कादंबरी लेखनातील दुसरा घटक म्हणजे निवेदन पध्दती. लेखकाला जे सांगायचे आहे, जो प्रसंग रंगवायचा आहे तो कोणत्या पध्दतीने निवेदन करतो यावर कांदबरीचे यश अवलंबून असते. घडणारे प्रसंग ज्या क्रमाने घडत गेले त्याच क्रमाने त्याने निवेदन केले की, कुठून एखाद्या मधल्याच भावप्रसंगातून सुरुवात करुन त्याने वाचकांची चित्तवृत्ती जागृत केली हे त्या त्या लेखकावर अवलंबून असते. निवेदन पध्दती प्रत्येकाची भिन्न असणार. पण 'विस्मय' व 'हुरहूर' ही वाचकांच्या मनात सतत तेवत ठेवली जाईल. अशा पध्दतीने लेखकाने निवेदन केले असता जास्त प्रभावी ठरते.

'गुंतागुंत, निरगाठ व नंतर उकल' अशा तीन स्थानातून कादंबरीचा प्रवास होतो असे फडकेप्रणीत कादंबरीचे स्वरूप मानले गेले. पण श्री. ना. पेंडसे यांच्या 'गारंबीचा बापू' सारख्या कादंबरीने 'घटकांची' आणि रचनेची चौकट मोडूनही 'दर्जेदार' कादंबरी तयार होते हे स्पष्ट केले. मनोविश्लेषणात्मक किंवा संज्ञाप्रवाही कादंबरीचे स्वरूप पाहता कादंबरीला घटकांच्या ठराविक चौकटीत बसविता येत नाही. तसेच तिच्या रचनेचा आराखडा निश्चित करता येत नाही.

कादंबरी सतत रसोत्कर्षित ठेवण्यासाठी अनुभवाचे प्रशस्त दालन, अवलोकनाची, धुरा संभाळणे किंवा निवेदन पध्दतीत येणारी विस्मयता हे जसे आवश्यक आहे तसेच पार्श्वभूमीची निर्मिती करणे आवश्यक असते. इतर कलांतही पार्श्वभूमीला असाधारण स्थान असतेच. 'पार्श्वभूमीचे अस्तित्व हा एक कलावस्तूचा सामान्य नियमच असतो, तसे असेल तर कादंबरीत तो नियम मान्य समजलाच पाहिजे'. कादंबरीत जी घटना घडवणार आहे त्याचे स्थळ, काल, त्याचे नैसर्गिक स्वरूप मग ते रुक्ष अथवा सुंदर, गंभीर कसेही असो, पात्रे, त्यांची मते या सर्वांची मिळून पार्श्वभूमी तयार होते. ही पार्श्वभूमी रंगवण्याची

प्रत्येकाची कल्पकता वेगळी असते. कादंबरीतील घटना, प्रसंग, कथेचे स्वरूप याप्रमाणे ती भिन्नही असते. ऐतिहासिक कादंबरीत लेखकाला ती बऱ्याच अंशी सहज मिळते पण सामाजिक कादंबरीत मात्र त्याला चतुराईने तयार करावी लागते. या पार्श्वभूमीला फडक्यांनी 'वातावरण निर्मिती' असे संबांधले आहे. एखादे कृत्य किंवा प्रसंग निर्मिती होत असते तेव्हा तिला उठाव आणण्याचे मोलाचे कार्य हे वातावरण निर्मितीने साधले जाते. कादंबरीतील पात्रात जिवंतपणा आणण्यासाठी वातावरण निर्मिती उपयोगी पडते.

त्या त्या प्रसंगाच्या वेळची निसर्गाची ठेवण आणि जवळच्या सजीव-निर्जीव पदार्थाची मांडणी या दोहोंचे मिळून वातावरण बनत असते. गायकाच्या कंठध्वनीला संगीताच्या साथीने उठाव येतो. तसे प्रसंगाशी साम्यविरोधी भावना सूचित करण्याचे कार्य वातावरण निर्मितीत दडलेले असते.

कादंबरीमध्ये कथानक असते. ज्यात व्यक्ती समाज किंवा व्यक्ती व्यक्ती असा संघर्ष असतो. व्यक्ती तिचे स्वभाव, गुण, आदीतून लेखक त्याचे दर्शन वाचकांना घडवत असतो. 'व्यक्तिदर्शन' व 'कथारचना' ही ललित लेखनाची अत्यंत महत्वाची अंगे आहेत. हे फडक्यांचे विधान सर्वास मान्य होणारे आहे. त्यातही कथारचनेपेक्षा व्यक्तिदर्शनाला त्यांनी अधिक महत्व दिलेले दिसते. लेखकाला व्यक्तिद्वारा प्रसंग वाचकापुढे उभा करता येतो. प्रसंग उभा करण्याचे कौशल्य व्यक्ती दर्शनातून दिसते. वाचकाला अत्यानंद मिळवून देण्यासाठी किंवा त्याची जिज्ञासा सतत जागृत ठेवण्यासाठी लेखकाला समर्पक व्यक्तिदर्शन घडवून आणावे लागते. व्यक्तिदर्शनचातुर्य लेखकाने साध्य करुन घेतले असेल तर परिणामकारक व्यक्तिरेखेतून उठावदार व संघर्षमय प्रसंग चितारुन तो वाचकाच्या हृदयाला हात घालू शकतो. कथानकातून व्यक्ती निर्माण करण्यापेक्षा व्यक्तीतून कथानक साकारत जावे असे फडके स्पष्ट सांगतात. लेखकाच्या वर्णनातून वर्ण्य व्यक्ती वाचकांच्या पुढे मूर्तिमंत उभी राहते. उदा. हरिभाऊंच्या कादंबऱ्यातली अनेक पात्रे वाचकाच्या डोळ्यांपुढे प्रत्यक्ष वावरताना दिसतात. समाजातील नानाविध प्रवृत्तीच्या व्यक्तीची मते लेखकाला वाचता आली तर व्यक्तिदर्शन घडवणे त्याला सहज शक्य होईल. समाजातील अनेक प्रकारचे लोक, त्यांच्या मनात चाललेली आंदोलने लेखकाने अंत:चक्षूने वाचली, त्याला ती भावली तर ते तो इतरांमध्ये परावर्तित करु शकेल. म्हणजे 'व्यक्तिदर्शन' या घटकाला कादंबरी लेखनात अतिमहत्वाचे स्थान आहे.

व्यक्तिदर्शन करणे म्हणजे व्यक्ती तितक्या त्यांच्या प्रवृत्ती, त्यांचे स्वभाव, त्यांचे गुण हे यातून कथानक पुढे सरकवणे. मग येथे व्यक्ती आल्या की त्यांच्यातला संघर्ष आलाच. जीवनामध्ये,

समाजामध्ये, निसर्गामध्ये विरोधाभास आहे म्हणून जीवनाची गोडी प्रत्येकाला वाटते. उन्हाने तापल्याशिवाय पावसात भिजण्याचे समाधान होणार नाही. पाणी संथ, सरळ वाहते. तेथे काही नाविन्य नसते. पण दोन प्रवाह विरोधी दिशेने एकमेकांवर आदळत असतील तर त्या खळखळाटाने मनाची संवेदना जागृत होते. नाविन्य, चैतन्यच जणू संचारते. भले ते कसेही असो. त्यांचा परिणाम काहीही असो पण संघर्षाशिवाय जीवनात रुची नाही हे खरे वाटते. लेखकही जीवनाच्या वाटेवर भेटलेल्या सुखी–दु:खी लोकांची व्यक्तीमधील स्वभाव गुण–दोषांची, निसर्गातील घडामोडीची, त्याच्या भावनेला भावलेल्या घटनांची शिदोरी तो वाचकासमोर उलगडत असतो. या सर्वांमधला संघर्ष त्याच्या नजरेसमोर प्रामुख्याने टिपला जातो. त्याचे प्रतिबिंब तो शब्दरुपाने गुंफत जातो.

संघर्ष हा कलाकृतीचा आत्मा असतो. कथानकात गुंतागुंत व नंतर उकल करण्यासाठी जी निरगांठ असते तेथे संघर्ष प्रतिपादन करावा लागतो. वाचकाला सतत उत्कंठित ठेवायचे असेल किंवा त्याची जिज्ञासा सतत जागृत ठेवण्यासाठी संघर्षाचे आयोजन आवश्यक असते. साधी, सरळ संघर्षहीन कथा, कोणास रुचणार नाही पण ज्यामध्ये स्पर्धा आहे, झुंज आहे अशी कथा वाचण्यासाठी वाचक आतूर असतो. म्हणून 'संघर्ष हा काव्याचा आत्मा असतो' असे म्हणतात.

कल्पकतेच्या घोड्यावर आरुढ होऊन, वातावरण निर्मितीचे शस्त्र हाती धरुन किंवा संघर्ष केंद्रस्थानी ठेवून व्यक्तिदर्शन घडवणाऱ्या लेखकाला घटना, प्रसंग, सारे काही नमूद करायचे असते. त्याचे माध्यम असते भाषा. भाषा हे मानवाला जादा लाभलेले, त्याने आपल्या बुध्दीबळाने प्रगत केलेले असे महान वरदान, आभूषण आहे. त्याने तो इतर प्राण्यांपेक्षा निराळा, अधिक सुशोभित दिसतो. या भाषाशैलीच्या निराळेपणाचे मोहक पुष्प हाती धरुन तो आपली कलाकृती सुगंधित करतो. त्या रंगछटातून तो आपल्या कलाकृतीत रंग भरत असतो. आपले अंतर नेत्र उघडून दाही दिशांचा वेध घेऊन ती लेखनकृती बेहोशपणे प्रसवत असतो. जसे जन्मदात्री प्रसववेळी बेहोश असते. ती जग विसरुन प्रसववेदना सहन करत असतो. ती त्यावेळी फक्त अपत्य या एकाच गोष्टीशी तन्मय, एकरुप झालेली असते. भारावलेली असते. तद्वत लेखक काही काळ जगाचे व्यवहार विसरुन झपाटलेपणाने कलाकृतीत पूर्ण समरसून गेलेला असतो. या सर्व घटकांना योग्य न्याय मिळतो तो भाषा रुपाने. लेखकाची भाषा कादंबरीत प्राण फुंकून तिला जीवन देते. लेखक वाचकाचे नाते जोडून देते. लेखकाच्या अंतर्मनातील भावनात्मक भावविश्व वाचकापर्यंत वाहून नेण्याचे मौलिक कार्य भाषा करत असते.

"भाषेच्या शैलीचा गुण वाचकाच्या बुध्दीस प्रतीत होणारा नसून भावनेस कळणारा आहे."[५] हे फडक्यांचे विधान सार्थ वाटते. भाषा ही दुहेरी कार्य करणारी संस्था आहे. ती अर्थवाहक व ध्वनिकवाहक आहे. "ध्वनिवाहक व अर्थवाहक ही दोन अंगे एकमेकांस अनुरुप असली म्हणजे अंत:करणास सुखावणारे असे काही एक अवर्णनीय माधुर्य तिच्या ठिकाणी उत्पन्न होते. या शोभेला भाषाशैली म्हणतात."[६] अशी भाषाशैलीची व्याख्या फडक्यांनी केली आहे. पात्राच्या व्यक्तिवैशिष्ट्यांशी भाषेने संवादित्व राखले पाहिजे. विचाराची व वाक्याची समांतर गती उत्तम सांभाळणे हे भाषाशैलीचे महत्वाचे अंग मानले जाते.

अलंकारांनी नटलेली किंवा संस्कृत प्रचूर शब्दांनी बोजड झालेली भाषा उत्कृष्ट शैली होत नाही. याउलट फडके म्हणतात, भाषाशैली म्हणजे भाषेतला 'सहजपणा'. व्यक्ती तितक्या भाषाशैली असू शकतात. अंतकरणातून निघालेले मधुर स्वर म्हणजे त्या लेखकाची भाषा असते. तिला विशिष्ट नाद, लय असतो. त्या लयीमुळे भाषेला जिवंतपणा येतो. सहज सरळ, ओघवती शैली जर लेखकाने आत्मसात केली असेल तर वाचक त्यात आकंठ डुंबून कथानकाचा मनसोक्त आनंद उपभोगतो.

भाषा ही बुध्दीने पारखण्याबरोबरच भावनेने अनुभवायची व्यवस्था आहे. त्यामुळे तिचा स्वरउगम हा अंत:करणातून व्हावा लागतो. असे हे कादंबरीचे अंतरंग विविध रंगांनी, रसांनी भरलेले असते.

**कादंबरीचे प्रकार :-**

'कादंबरी' हा शब्द आपला, पण कल्पना परकीय आहे. मराठी साहित्याचा इतिहास सातशे-आठशे वर्षांचा आहे. परंतु मराठी कादंबरीचा इतिहास जेमतेम सत्तर वर्षाचा आहे. हे ना. सी. फडके यांचे विधान ग्राह्य मानले तरी या साहित्य प्रकारचे मूळ शोधण्यासाठी देशोदेशी हिंडावे लागते. साहित्यप्रकार हे देशकाळातीत असतात तसे देशकालनिष्ठही असतात. कादंबरी हा प्रकार संयोगाने इंग्रजी वरुन आला तरी रचनाप्रकार म्हणून तरी तो हिंदुस्थानला नवा नाही. असे मत भालचंद्र नेमाडे यांनी मांडले आहे.

कादंबरी या वाङ्मय प्रकाराने स्वतंत्र अस्तित्व निर्माण केल्यानंतर तिचे अनेक प्रकारात विभाजन झाले. सुरवातीस अद्‌भुतरम्य किंवा भाषांतरीत, रुपांतरीत, अशी वळणे घेत कादंबरी अनेक शाखांनी बहरली आहे. मानवी मनाला सुरवातीपासून रंजक कथेची गोडी वाटत आली आहे. अध्यात्म, तत्वज्ञान, विज्ञान हे मनाला आकर्षित करीत नाहीत. पण अद्‌भूत कथा, मनोरंजनपर गोष्टी यामध्ये मन लगेच गुरफटून जाते. हे साहित्य जणू मनाला भुरळ घालते.

१८६१ मध्ये हळबे लक्ष्मीशास्त्री यांची 'मुक्तामाला', १८६८ मध्ये 'रत्नप्रभा' किंवा रिसबूडांची 'विश्वासराव' व 'वसंत कोकिळा' या कादंबऱ्यातून अद्भूततेचे दर्शन घडते. या कादंबऱ्यांचे स्वरूप ठराविक चाकोरीबध्दता दर्शवते. नायक-नायिका यांच्यावर येणारे संकट, नायकाचा अद्भूत पराक्रम, दोघांचे मनोमिलन, त्याचे लग्नात रुपांतर असे हे साचेबंद कथानक असे. गांभीर्याचा अभाव, कल्पकतेवर भर, योगायोग,चमत्कार आदींना महत्व दिसते. संस्कृतमिश्रित बोजड भाषा, शाब्दिक कसरत, मोठी वाक्ये असे काहीसे भाषेचे स्वरुप असे. ही कादंबरी वास्तवापासून बरीच दूर असे. प्रेम, शौर्य, साहस याभोवती तिचे गुंफण असे. अवास्तव केवळ कल्पकतेच्या, अद्भुततेच्या विश्वावर विसंबलेले साहित्य फारसे टिकत नाही.

अद्भुततेच्या भोवऱ्यातून बाहेर पडून कादंबरी इतिहासात डोकावू लागली. आपल्या समाजाची शांतीची भुरळ ओसरली होती. लोकांच्या बुध्दीला पारतंत्र्याची जाणीव तीव्रतेने चटके देऊ लागली. जीवनाकडे लोक निव्वळ चमत्कार किंवा योगायोग या नजरेतून न बघता बुध्दीच्या डोळ्यांनी, विचारांच्या जाणीवेतून पाहू लागले. त्यांच्या मनाची अस्वस्थता वाढीस लागली. त्यांची मने अंतरमुख होऊन देशाचा, परंपरेचा विचार करु लागली. देशाविषयी अभिमानाची ज्योत त्यांच्या हृदयात पेटली. जनजागृती करणे, देशाला पारतंत्र्यातून बाहेर काढणे, आपण माणूस आहे, बुध्दीने विचाराने समाजाकडे देशाकडे, देशाच्या स्थितीकडे, समाजाच्या घसरणीकडे डोळेझाक करुन चालणार नाही. जनमनाच्या पटलावर जागृतीचे, परिस्थितीचे आंदोलन झाले पाहिजे या विचारांचे थैमान काही विचारवंतांच्या मनात सुरु झाले.

## १) ऐतिहासिक कादंबरी :-

१९७१ ला गुंजीकरांची 'मोचनगड,' पटवर्धनांची 'पहिला बाजीराव 'अशा सुरवातीच्या वळणांनी कादंबरीने हरिभाऊंच्या काळात प्रवेश केला. हरिभाऊंच्या काळात तिला मानाचे स्थान मिळाले. त्यांची 'वज्राघात' अनेकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवून गेली. इतिहासाचे अवलोकन व कादंबरी लेखनातील कला कौशल्य यांचा मेळ साधून कलाकृती साकारली तर ती मनाचा वेध घेणारी ठरते. आपल्या राष्ट्राला थोर ऐतिहासिक परंपरा असूनही अनेक दिग्गजांनी इतिहासाकडे पाठ फिरवली , साधारण लेखकांचीच लेखणी इतिहासाकडे वळल्यामुळे जशा व्हाव्या तशा ऐतिहासिक कादंबऱ्या निर्माण झाल्या नाहीत. इतिहासामध्ये त्या महापुरुषांची ओळख करुन देणे, थोर पुरुषांच्या थोरवीचे, पराक्रमाचे, विचारांचे, नवीन पिढीत संक्रमण करणे हा हेतू असला तरी त्या दर्जाने कमी ठरल्या.

इतिहास लेखनाची हौस असली तरी कलेचा अभाव, संवादांना जास्त महत्व, स्थळ, काळाचे वर्णन कमी किंवा ऐतिहासिक पुरावे कमी असे कादंबरीचे स्वरुप असे. एकूण काय हरिभाऊंनी तयार केलेल्या ऐतिहासिक प्रवृत्तीचा इतरांनी महामार्ग करणे गरजेचे होते. पण तसे झाले नाही . ऐतिहासिक पुराव्यांचा अभाव असेल किंवा अध्ययनाची कमतरता असेल तर कादंबरीकाराला कल्पनेवर भिस्त ठेवावी लागते. त्यामुळे ऐतिहासिक कादंबरी, त्यावेळेच्या स्थळ, काळाशी, समाज जीवनाशी जवळचे नाते सांगत नाही. इतिहासातील व्यक्तींचे कलागुण, स्वभाव, दोष कळतात. त्यामुळे त्या पात्राविषयी आदर किंवा द्वेष निर्माण होतो. पण वाचकांच्या मन:चक्षू पुढे इतिहासातील तो काळ किंवा ते स्थळ उभे रहात नाही. हरिभाऊंच्या कादंबरीची दिशा बदलून 'स्वामी' ने नवी वाट तुडवली तरी तीमध्ये सुध्दा ऐतिहासिक कादंबरीचे निकष पूर्णत्वाने येतात असे नाही.

## २) पौराणिक कादंबरी :-

ऐतिहासिक वळणाने जाणारी पौराणिक कादंबरी याच रांगेत मोजता येते. इतिहास व पुराण यामध्ये फारसा फरक आपल्याकडे मानत नाहीत. ऐतिहासिक कादंब-या प्रमाणेच पौराणिक कादंबऱ्याही पुराणातील आयती पात्रे रंगवून लिहिल्या गेल्या. आदर्श, अद्‌भूत, आभासात्मकतेवर भर असे वास्तवापेक्षा त्या वेळचे जनजीवन, चालीरिती यांची पुरती ओळख होण्यापेक्षा कल्पकता अधिक असे. पुराणातील पौराणिकता बाजूला पडून रंजकता ओतली जाई. पण मूळ हेतू बाजूला राही. उदा. ययाती, कर्णायन, मृत्युंजय इ.

## ३) सामाजिक कादंबरी :-

कादंबरी विश्वात महत्वाचे स्थान असणारा प्रकार म्हणजे सामाजिक कादंबरी. कादंबरी लेखनाची परंपरा विस्तारत गेली अन् अनेक डोळ्यांनी ती सर्व क्षेत्रांकडे बघू लागली. रंजकता, चमत्कार, बाजूला ठेवून ती वास्तवाकडे उघड्या डोळ्यांनी बघू लागली. समाजात घडणाऱ्या घटना, चाललेली उलथापालथ यांचे यथायोग्य वर्णन करुन समाज परिवर्तन करणे हे साहित्याचे कर्तव्य आहे. त्याची ती नैतिकता-बांधिलकी आहे असे वाटून कादंबरी लिहिली जाऊ लागली. समाज म्हटले की, समस्या आल्याच. ऊन-पावसाच्या खेळात मानवी जीवन सतत बदलत असते. ब्रिटिश राजवटीमुळे काही तोटे झाले. खूप हानीही झाली. पण वाईटातून काहीतरी चांगले निष्पन्न व्हावे तसे त्या परकीय राजवटीने आपल्या लोकांचे अंतरबाह्य परिवर्तन केले. हिंदू समाज अनेक वाईट चालीरिती, देवभोळेपणा, अज्ञान, अंधश्रध्दा, जातीभेद अशा अंधारात चाचपडत पडला होता. त्याला या अंधारातून बाहेर काढण्यासाठी

त्याच्या मनावरील खोट्या संस्कृतीचे, खोट्या धर्माचे पटल दूर सारण्यासाठी अनेकांची लेखणी सरसावली.

बाबा पद्मनजींची 'यमुना पर्यटन' ही पहिली सामाजिक कादंबरी मानली जाते. त्यांनी ती कादंबरी हिंदू धर्मातील दोष व ख्रिस्ती धर्मप्रसार या हेतून लिहिली आहे. त्यानंतर 'अवलिया', 'शिरस्तेदार' अशा कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. या कादंबऱ्या सदोष होत्या पण त्यांनी सामाजिक कादंबरी लेखनाचा पाया घातला. त्यानंतर कादंबरी क्षेत्रात अमर झालेल्या हरिभाऊंनी अनेक कादंबऱ्या लिहिल्या. 'आज कालच्या गोष्टी' या यथार्थ नावाने त्यांनी प्रसिद्ध केल्या. भूतकाळातील किंवा कल्पनेतील चित्रापेक्षा वर्तमानात नजर स्थिर केली. तत्कालीन समाज, स्त्रीचे दास्यत्व, समाजातील विषमता, कुटुंबातील वैमनस्य आदीं गोष्टींवर प्रकाश टाकला. व्यक्तीची समस्या हीच समाजाची समस्या किंवा समाजाची समस्या हीच व्यक्तीची समस्या असते.

## ४) समस्या प्रधान कादंबरी :-

देशाला स्वातंत्र्य मिळाले तरी अनेक समस्या निर्माण झाल्या. वाचनातून, परकीय राजवटीत मानवाची वाटचाल स्वत:मधील उणीवा, जाणीवा शोधू लागली. मध्यमवर्गीय समाजापुढे अनेक प्रश्न आ वासून उभे होते. विषमता, सत्वहीनता, बेकारी इ. समस्यांनी उग्र रुप धारण केले. उपेक्षित जीवनाचा प्रथम हुंकार विभावरी शिरुरकरांच्या लेखणीतून 'बळी' च्या रुपाने बाहेर पडला. त्यांनी समाजातील बदलत्या समस्यांकडे, उपेक्षितांकडे बघण्याची एक दृष्टी दिली. त्यानंतर 'चक्र', 'माहिमची खाडी,' 'फकिरा',' बारी' अशा अनेक कादंबऱ्या उदयास आल्या. हरिभाऊंनी त्या काळच्या समाजाचे दर्शन घडवून कादंबरीकारांसमोर आदर्श उभा केला होता. त्याची कास धरुन अनेकांनी हा प्रवाह सुरू ठेवला. तरीही जितक्या प्रमाणात समस्यांचे तांडव सुरू होते. जेवढे त्यांचे स्वरुप उग्र होते, तेवढ्या प्रमाणात कादंबरीकारांचे लक्ष सामाजिक कादंबरीकडे गेले नसल्याचा दावा अनेक जण करतात. हिंदुस्थानातील पहिल्या कादंबरीचा मान 'यमुना पर्यटन'ला दिला. ती सामाजिक समस्यावर प्रकाश टाकणारी कांदबरी ठरते. हरिभाऊंनी या दिशेने यशस्वी वाटचाल करावी एवढी पार्श्वभूमी मिळून सुध्दा सामाजिक कादंबऱ्यात लेखणी फार सखोल प्रवेश करु शकली नाही, असे काही समीक्षकांनी मत मांडले आहे.

## ५) रीतिप्रधान कांदबरी :-

'मुक्तामाला' प्रवृत्तीच्या प्रवाहात पुढे जाणाऱ्या कादंबरीला रीतिप्रधान असे नेमाडे म्हणतात. पु. शि. रेगे, खानोलकर, माधव कानिटकर, सुमती क्षेत्रमाडे आदी कादंबरीकारांनी या क्षेत्रात योगदान

दिले. फडके, खांडेकरांचा काहीसा वारसा त्यांनी पुढे चालवला असे नेमाड्यांचे मत आहे. "लैंगिकता, वासना, कामविकृती, मारहाण, जबरी संभोग, खून, आत्महत्या असे ठरीव आशय या प्रवृत्तीत येतात."[७] तपशीलाचा मुख्य विचार रीतिप्रधान कादंबरी करीत नाही. जीवनमूल्ये, नैतिक मूल्ये हरवल्यामुळे पात्रे लाचार, दीन, हीन, मानवतेपासून दूर, विचारहीन, भरकटलेली, मूर्ख असतात. १९६० नंतर ही प्रवृत्ती बळावली असे नेमाडेंचे स्पष्ट मत आहे. दुर्दैवाने मराठी अभिरुचीची अतोनात हानी करणाऱ्या या प्रवृत्तीलाच 'कलात्मक', 'सौंदर्यवादी' अशी लेबले लावली गेली.

सामाजिक संदर्भ, नैतिक मूल्ये, वास्तवता यापासून दूर जाऊन परिणाम घडवून आणणे याला हे लोक कला किंवा सौंदर्य समजू लागले. पंडिती काव्याची धुरा जणू यांना पेलायची आहे, या आवेशात त्यांनी पंडिती काव्याशी जवळीक साधलेली दिसते. भाषेला प्रतिमा–प्रतिमेचे इतके अलंकार घातले, की ती त्याने सजलेली दिसण्याऐवजी अतिशयोक्तिच्या भाराने तिचे मूळ सौंदर्य खुलण्याऐवजी बेगडी दिसू लागले. विचारापेक्षा भावनेला महत्व देणे, सामाजिकता टाळणे यामुळे विकलांग झालेल्या पात्रांना निर्मिण्यासाठी मानसशास्त्राचा किंवा कल्पकतेच्या कुबड्यांचा आधार द्यावा लागे. हे कादंबरीकार पौगंडावस्थेतील लैंगिकतेत पुरते अडकलेले दिसतात. नाजूक भाषा, पातळ शैली, भोगवादी, भावनाप्रधान पण दिशाहीन पात्रे, महाराष्ट्रा बाहेरचा , कल्पित भूप्रदेश असे सारे ना स्थळ, ना काळाचे भान, ना वास्तवतेचा आधार, ना नीतीमूल्यांचा स्वीकार असे एकूणच अवास्तव अभासयुक्त विश्व या कादंबरीकारांनी निर्माण केले.

### ६) चरित्रात्मक कादंबरी :-

मराठी कादंबरी विश्वातील अगदी अगदी अलिकडचा प्रवाह म्हणून चरित्रात्मक कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. कादंबरीकारांनी इतिहास किंवा पुराणातून काही पात्रे योजून त्यातून त्या त्या व्यक्ती लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न केला. तसेच राजकारण, समाजकारण, शिक्षण, वैद्यकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या ज्या आदर्श व्यक्ती आहेत, त्यांच्या कार्याची, त्यांनी समाजासाठी दिलेल्या योगदानाची त्या समाजाला ओळख पटावी या हेतून लेखन केले. त्या व्यक्तीभोवती, त्याच्या जीवनातील चढउतार याभोवती वास्तवतेत कलेचा आविष्कार गुंफून लिहिले जाते. 'हरिभाऊ' या भीमराव आपटे लिखित कादंबरीने या चरित्रात्मकतेची मुहूर्तमेढ रोवली. पण आनंदीबाई जोशी व गोपाळराव जोशी यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी कादंबरी लिहून श्री. ज. जोशी यांनी 'आनंदी–गोपाळ' या नावाने हा प्रवाह लोकप्रिय करण्याचे श्रेय घेतले.

फक्त चरित्र लिहिले, त्यातील क्रमवार घटना लिहिल्या तर तो इतिहास किंवा नीरस साहित्य होईल. या कादंबरीकारांनी चरित्राला कादंबरीच्या साच्यात बसवण्यासाठी मूळ चरित्रातील घटना, त्यांच्या जीवनातील प्रसंग, घटना या भोवती कलेचे, काहीसे कल्पकतेचे आवरण चढवले. त्यातून त्यांनी कलावंताच्या नात्याने सुसंगत मानवी व्यक्तिमत्व शोधून त्यांच्या जीवन प्रेरणांचा अर्थ शोधण्याचे कार्य केले. चरित्र रुप कादंबरी लालित्यपूर्ण होण्यासाठी सत्यशोधनात कल्पकतेचा रंग भरलेला असतो. मराठीमध्ये 'आनंदी गोपाळ', 'साहेब', 'श्रीमान योगी', 'यज्ञ', 'अमृतपुत्र' अशा कादंबऱ्यांनी यश मिळविले.

## ७) मनोविश्लेषणात्मक कादंबरी :-

लेखन-वाचन परंपरा सर्वसामान्यांनी अंगिकारली आणि त्यांच्या मनाचा परीघही तसाच विस्तारत गेला. मानवी मनात दोन मनांचे द्वंद्व सतत सुरु असते. एक प्रगट स्वरूपात तर दुसरे सुप्त किंवा अप्रगट असते. मानवाची जीवनाकडे, समाजाकडे बघण्याची नजर बदलली. तसे त्याचे अनुभव क्षेत्रही रुंदावले. वास्तव कितीही स्वीकारायचे किंवा ते प्रगट करायचे ठरविले तरी काही नितीमूल्ये किंवा समाज चाकोरी जपताना त्याला आपले विचार, स्वप्ने ही अप्रगट, सुप्त मनात कोंडून ठेवावी लागतात. मग बऱ्याच वेळा ती स्वप्ने, दिवास्वप्ने लेखक प्रतिभेला कल्पनेचा साज चढवून शब्दरुपाने व्यक्त करु लागला. मानवी मन हे गुंतागुंतीचे जाळे असते. मानवी मन हे सदा सर्वकाळ एकाच गुणांचा स्वीकार करते असे नव्हे. कधी चांगले, नीतीमान, सत्वशील असते. तर कधी वाईट प्रवृत्तीकडे धावते. याच अंतर मनाचा वेध घेणे म्हणजे मनोविश्लेषणात्मक लेखन असे म्हटले तरी वावगे ठरु नये. व्यवहारात माणसाने कितीही सात्विक किंवा नैतिक मूल्यांची जोपासना केली तरी त्याच्याही मनाच्या प्रवृत्तीनुसार किंवा स्वभावधर्मानुसार त्याच्या अंतरमनातही काही गोष्टींची खळबळ चाललेली असते. हे नाकारता येत नाही. हीच अंतरमनातील काही अपूर्ण स्वप्ने, वासना, भावना तो साहित्यरुपात प्रगट करु इच्छितो. माडखोलकर व प्र. य. देशपांडे यांच्या कादंबऱ्यातून काही मनोविश्लेषणात्मक स्वरुपाच्या बाबी आल्या आहेत. माडखोलकरांना खरोखर मानवी मनांचे सूक्ष्म भावतरंग उलघडता आल्याची जाणीव होते. वासनेची प्रबलता, तिच्या पूर्तीची आवश्यकता, अनैतिक प्रेम, त्याचे उदात्तीकरण, मनुष्य स्वभावाचा अनेक पदरी, समलिंगी आकर्षण या सर्वांचा विचार करता फ्रॉईडच्या अभ्यासाने मराठीत खूपच कल्पनांना धक्के देण्याचा प्रयत्न केला असे दिसते.

याच प्रवाहाला 'संज्ञाप्रवाही' चित्रण असेही म्हटले जाते. मर्ढेकरांनी 'रात्रीचा दिवस' कादंबरीत संज्ञाप्रवाहाचे चित्रण केले आहे. तो पहिला प्रयोग होता. या मनोविश्लेषकांचा बहुतेकांना स्वीकार करता आला नाही असे दिसते. आदर्शवाद, वास्तवाची जाणीव अशा काही मूल्यांमुळे मानवी मनाच्या तळापर्यंत जाता आले नाही. ज्यांनी या मनामध्ये वस्तुनिष्ठता पाहिली त्यांना टीकेला सामोरे जावे लागले. त्यामुळे जीवनानुभवाकडे प्रांजळपणे पाहण्याचा प्रयत्न कोणी केला नाही. याला अपवाद 'रणांगण' कादंबरी. या कादंबरीची रचना मन:पटलावर झालेली आहे. युध्दातील भयानकता, ज्यूं यांच्या भयावह यातना, उध्वस्त संसाराचे वास्तव स्वरूप, हे सर्व घटनांमधून, संवादातून वाचकांपुढे ठेवले आहे. ''स्वप्ने, संज्ञाप्रवाही चित्रण, वासनेचे दमन, शमन व उदात्तीकरण, अपरिहार्य प्रतिकात्मकता, या सर्व दृष्टींनी 'रणांगण' एक महत्वाची मनोविश्लेषणात्मक कादंबरी वाटते.''[८]

## ८) प्रादेशिक कांदबरी :-

प्रादेशिक कादंबरीचा प्रवाह हा स्वातंत्र्योत्तर कालखंडात नव्याने सुरु झाला. विशिष्ट प्रदेशाचा भरघोस ठसा वाचकांच्या मनावर उमटायला हवा असा प्रयत्न लेखकाने केलेला असतो. प्रादेशिक कांदबरीत प्रमुख पात्रा इतकेच महत्व प्रदेशाला दिलेले असते. त्यामुळे व्यक्तीच्या स्वतंत्र स्वभावा इतकेच त्या प्रदेशालाही स्वतंत्र अस्तित्व आहे असे वाचकाला वाटते.

अनेकांनी असे प्रदेशदर्शन व तेथील निसर्गा बरोबर मानवी जीवन ही यथार्थ चित्रित केला आहे. उदा. ''पर्ल बक ने चिनी लोकजीवनाचे आपल्या विविध कादंबऱ्यातून जे चित्रण केले आहे, त्यातून खऱ्या खुऱ्या अर्थाने प्रादेशिकतेचे दर्शन घडते.''[९]

प्रादेशिकता म्हणजे केवळ लोकजीवन किंवा फक्त निसर्गवर्णन असे म्हणता येणार नाही तर प्रादेशिकता खरेच मन:चक्षूसमोर उभी करण्यासाठी लेखकाला लोकजीवनाचे प्रत्ययकारी दर्शन घडविले पाहिजे. त्याचबरोबर तेथील बोली भाषा, तिथल्या चालीरिती, पोखाखातल्या तऱ्हा यांचा उपयोग संयमाने व कुशलतेने करायला हवा.

आपल्याकडे व्यंकटेश माडगूळकर, र. वा. दिघे व श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यातून प्रादेशिकतेचा प्रत्यय येतो. दिघ्यांच्या 'पाणकळा' (१९४०) पासून प्रादेशिकतेच्या कक्षा रुंदावल्या असे म्हणता येईल.

### ९) ग्रामीण कादंबरी :-

मराठीत तसा हा नवीन प्रवाह आहे. पांढरपेशा समूहातून बाहेर पडून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणे अनेकांना महत्वाचे वाटू लागले. ग्रामीण भागातील अनेक जण शिक्षण घेऊन शहरात आले तरी ते आपल्या जन्मभूमीला, मातीला विसरु शकत नाहीत. त्या मातीच्या अंगाखांद्यावर खेळून आपण मोठे झालो त्या मातीशी आपली नाळ जोडलेली आहे ती अतूट आहे, हे विसरण्याचा कृतघ्नपणा करु नये असे अनेकांना वाटू लागले. त्या प्रेरणेतूनच, त्या मातीच्या स्नेह ओलाव्यातून अनेक कादंबऱ्या निर्माण झाल्या. अण्णाभाऊ साठे, उध्दव शेळके, शंकर पाटील, रणजित देसाई, हमीद दलवाई, रा. रं. बोराडे, आनंद यादव, व्यंकटेश माडगूळकर, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे इ. लेखकांनी ग्रामीण कादंबरी विश्वात मोलाचे योगदान दिले.

जीवन जगताना येणारे बरे-वाईट अनुभव, खेड्यातील लोकजीवन, शेती, गुरे-जनावरे यांच्याशी असणारे मानवाचे नाते लेखक चित्रित करतो. या कादंबऱ्या लेखकाने स्वअनुभूतीने रेखाटलेल्या असतात. एकूणच कादंबरीचा प्रवास नागरी जीवनातून खेड्यातील ओढ्यापर्यंत पोहचविण्याचे मोलाचे कार्य या लेखकांनी केले असे म्हणता येईल.

### १०) राजकीय कादंबरी :-

राजकीय जीवनाला महत्व असते. सावरकरांची १९३६ साली लिहलेली 'काळेपाणी' ही कादंबरी त्या दृष्टीने अपूर्व आहे. राजकीय परिस्थितीचे चित्रण तटस्थतेने व शक्यतो संतुलित मनोवृत्तीने करायला हवे. त्यादृष्टीने निखळ राजकीय कादंबरी म्हणता येतील अशा कादंबऱ्यांची संख्या कमीच आहे.

नाथ माधव, प्रेमा कंटक, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, माडखोलकर यांनी राजकीय कादंबरी लेखन केले. स्वातंत्र्योत्तर काळात अरूण साधू, ना. इ. कल्याणकर, भालचंद्र फडके यांचे राजकीय कादंबरीलेखन दमदार झाले असे म्हणता येते.

### ११) दलित कांदबरी :-

शिक्षणाचा प्रसार सर्वत्र झाला. ग्रामीण भागातही लोक लिहू-वाचू लागले. मनातले विचार, आपला परिसर, मातीची ओढ त्यांच्या लेखनातून इतरांच्या पर्यंत पोहचू लागले. तसेच शिक्षणाची गंगा तळागाळातील लोकांनाही पावन करु लागली. ज्यांना कित्येक वर्षे उपेक्षित, हीन जीवन जगावे लागले होते. त्या जीवांना आपणही माणूस आहे याची जाणीव झाली. ती जाणीव एवढी तीव्र होती की त्यांच्या वेदनांची घुसमट ज्वालामुखीच्या रुपाने उफाळून वर आली.

जे भोगले, अनुभवले ते तसेच इतरांच्या समोर आणण्यास त्यांना संकोच वाटेनासा झाला. त्यातूनच दलित कादंबरीचा जन्म झाला. उदा. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, नामदेव व्हटकर, केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, इ. लेखकांचा उल्लेख करावयास हवा. त्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांनी जगलेल्या जीवनाचे चित्रण करणे हा हेतू ठेवला होता. 'चित्रा' (१९५१), 'फकिरा' (१९५९), 'वैजयंता' (१९५९), शंकरराव खरात 'हातभट्टी' (१९७०), नामदेव व्हटकर यांनी 'अपराधी' (१९४३) मध्ये बेवारशी अनाथ मुलांचा प्रश्न मांडला आहे. नामदेव ढसाळ यांनी 'हाडकी हाडोळा' (१९८१) ही कादंबरी लेखकाच्या अनुभव विश्वातून साकारलेली दिसते. तसेच अशोक व्हटकर यांची 'मेलेलं पाणी' (१९८२) ही कादंबरी चांभारांना कातडी पुरवणाऱ्या ढोर जमातीवर चित्रित केली आहे.

## सारांश

सारांश या प्रकरणामध्ये मराठी साहित्यात कादंबरीचे पदार्पण, कादंबरीचे विकसित होत गेलेले स्वरूप, तिच्यात होत गेलेले परिवर्तन आणि स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील कादंबरी व कादंबरीकार यांच्या विषयी स्थूल स्वरूपात विवेचन आले आहे.

इंग्रजी साहित्यातून कादंबरीची संकल्पना मराठी साहित्यात घेण्यात आली. संस्कृत साहित्यिक 'बाणभट्ट' यांच्या साहित्यकृतीतील 'कादंबरी' नावाच्या नायिकेवरून 'नॉवेल' साठी 'कादंबरी' हे नामाविधान स्वीकारले गेले. बाबा पदमनजी यांनी लिहिलेली 'यमुना पर्यटन' ही मराठीतील पहिली कादंबरी ठरली. कादंबरीच्या व्याख्या कालानुसार व महत्वपुर्ण कादंबरीकारानुसार बदलत गेल्या तरी कादंबरीची 'परिपूर्ण' व्याख्या तयार झालेली नाही. कादंबरी हा साहित्य प्रवाह सातत्याने व मोठया प्रमाणावर लिहिला जाणारा साहित्यप्रकार असल्यामुळे तिच्या अंतर्बाहय स्वरूपात जसजसा बदल होत राहतो त्याप्रमाणे तिच्या व्याख्येतही बदल होणे स्वाभाविक आहे. कादंबरीच्या विविध विचारवंतांनी विविध काळात केलेल्या व्याख्येवरून दिसून येते.

कादंबरी प्रवाहाची वळणे अंतर्बाहय बदल कसकसे होत गेले याचा या प्रकरणात उहापोह केलेला आहे.

महाराष्ट्रात स्त्री शिक्षण व स्त्रीपुरूष समानतेसाठी ज्यांनी सामाजिक चळवळी केल्या त्यात म.फुले, पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो कर्वे, वि.रा.शिंदे, यांचे योगदान मोठे आहे. तसेच शासकीय स्तरावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले. त्यांनी हिंदू कोड बीलांच्या प्रस्तावातून सामाजिक न्यायाचे तत्व प्रधान मानून घटनेमध्ये स्त्रियांना पुरूषवाच्या बरोबरीने हक्क दिले.

तात्पर्य, म.फुले, पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो कर्वे, महर्षी वि.रा.शिंदे, डॉ.आंबेडकर यांच्या योगदानामुळे व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या सर्व क्षेत्रातील सहभागामुळे स्त्रीशिक्षण व स्त्रियांचे लेखन या गोष्टींना गती मिळाली. त्यामुळे साहित्य क्षेत्रातही स्त्रिया स्वत्व जागृतीने लिहू लागल्या.

कादंबरीक्षेत्रात रूप आणि आशयाच्या अंगाने विविध प्रकार आले. अदभुतरम्य, ऐतिहासिक सामान्य कौटुंबिक, ग्रामीण प्रादेशिक, राजकीय, वैज्ञानिक कादंबरी, महानगरीय, दलित आदिवासी इ.त्यामध्ये १९६० नंतर स्त्रीवादी कादंबरीने शिरकाव केला. विशेषत: १९७५ साल हे जागतिक महिला वर्ष मानले गेले. त्यापार्श्वभूमीवर स्त्रीवादी लेखनाला नवे धुमारे फुटले.

## संदर्भ सूची

१) डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, 'मराठी कादंबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९, पृ. ३.

२) उनि. पृ. ३.

३) उनि. पृ. ७.

४) ना. सी. फडके, 'प्रतिसाधन', रा. ग. देशमुख आणि कंपनी, पुणे – २, सातवी आवृत्ती, १९६०, पृ.३३

५) उनि. पृ. २२१

६) उनि. पृ. २२३

७) संपा. गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर, 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९०७, पृ. ३२.

८) डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, 'मराठी कादंबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९, पृ. ९५.

९) बाळ शंकर देशपांडे, 'कादंबरी : विवेचन आणि विश्लेषण', स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती, पृ. ६३